साहित्य मंथन भाग –2

BLUE PRINT OF MODEL QUESTION PAPER -2 ( नील नकाशा)

Year : II nd Year PUC

SUBJECT : MARATHI

Sub Code : 07

DURATION : 3 HRS. 15 MINS

MAX. MARKS : 100

| पाठाचे नांव | | एकूण तास | ज्ञान | | | आकलन | | | उपायोजन | | | कौशल्य | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तूनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीघोत्तरी प्रश्न | वस्तूनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीघोत्तरी प्रश्न | वस्तूनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीघोत्तरी प्रश्न | वस्तूनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीघोत्तरी प्रश्न | |
| 1 | श्री. गोविंदप्रभूच्या लिळा | 04 | 1 | 3 | | | | | | | | | | | |
| 2 | मराठीयाची तो इज्जत वाचणार नाही | 03 | | | | | 4 | | | | | | | | |
| 3 | वीरराणी कित्तूर चन्नम्मा | 04 | 1 | | | | | | | | | | | | |
| 4 | शिक्षण हाच आमचा तरणोपाय | 05 | 1 | (3 ) | | | | | | | | | | | |
| 5 | माझ आयुष्य | 05 | 1 | | | | | | | | | | | | |
| 6 | श्री तुकारामाची त्रिशत सांवत्सरिक पुण्यतिथी | 05 | 1 | | | | | | | | | | | | |
| 7 | सतीचे शस्त्र | 05 | | | | | ( 4) | | | | | | | | |
| 8 | प्रदुषणावर उपाय नाही क? | 04 | | | | | | 6 | | | | | | | |
| 9 | आजीचे भाष्य | 03 | | | | | | ( 6) | | | | | | | |
| 10 | हदयसंवाद | 04 | 1 | | | | | | | | | | | | |
| 11 | जीवनाची सांयकाळ | 04 | | 3 | | | | | | | | | | | |
| 12 | हि मुले ....... त्यांचे हे वय | 05 | | | | | 4 | | | | | | | | |
| | **सोडविण्यासाठी दिलेले** | | 5/6 | 6/9 | | | 8/12 | 6/12 | | | | | | | 25/39 |
| 1 | पसायदान | 03 | | | | | ( 4) | | | | | | | | |
| 2 | बसवेश्वरांचे वचनामृत | 03 | 1 | | | | | | | | | | | | |
| 3 | संतवाणी | 04 | | | | | | | | | | | | | |
| | अ) किती हे सुख मानिती संसाराचे | | 1 | | | | | | | | | | | | |
| | ब) घेता नाम विठोबाचे | | 1 | | | | | | | | | | | | |
| | क) सत्वर पाव गे मला | | 1 | | | | | | | | | | | | |
| 4 | तू थोर दयासिंधू | 03 | | | | | 4 | | | | | | | | |
| 5 | सुंदर हिरवे माळ | 02 | | 3 | | | | | | | | | | | |
| 6 | गोफ | 03 | | | | | | 6 | | | | | | | |
| 7 | रात्र आहे वैऱ्याची | 03 | | 3 | | | | | | | | | | | |
| 8 | विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर | 03 | | (3) | | | | | | | | | | | |
| 9 | आई | 03 | ( 1) | | | | | | | | | | | | |
| 10 | सखी | 03 | | | | | | (6) | | | | | | | |
| 11 | निष्ठा | 03 | | | | | 4 | | | | | | | | |
| 12 | जीव माझा गुंतलाय | 03 | 1 | | | | | | | | | | | | |
| | सोडविण्यासाठी दिलेले गुण | | 5/6 | 6/9 | | | 8/12 | 6/12 | | | | | | | 25/39 |

साहित्य मंथन भाग –2

BLUE PRINT OF MODEL QUESTION PAPER -2 ( नील नकाशा)

Year : II nd Year PUC

SUBJECT : MARATHI — DURATION : 3 HRS. 15 MINS

Sub Code : 07 — MAX. MARKS : 100

| पाठाचे नांव | | एकूण तास | ज्ञान | | | आकलन | | | उपायोजन | | | कौशल्य | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तूनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीघोत्तरी प्रश्न | वस्तूनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीघोत्तरी प्रश्न | वस्तूनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीघोत्तरी प्रश्न | वस्तूनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीघोत्तरी प्रश्न | |
| 1 | पाझर | 06 | | | | | | 5 | | | | | | | |
| 2 | होरपळ | 06 | | | | | | 5 | | | | | | | |
| 3 | गळफास | 06 | | | | | | 5 | | | | | | | |
| | सोडविण्यासाठी दिलेले गुण | | | | | | | 10/15 | | | | | | | 10/15 |
| 1 | निबंध | 05 | | | | | | | | | | | | 10, ( 10),10 | |
| 2 | विभक्ती | 01 | 1,1,1,1,1 | | | | | | | | | | | | |
| 3 | अर्जलेखन | 02 | | | | | | | | | | | | 5 | |
| 4 | वाकप्रचार | 02 | | | | | | | 1,1,1,1,1 | | | | | | |
| 5 | समूहदर्शक शब्द | 01 | | | | | | | 1,1,1,1,1 | | | | | | |
| 6 | म्हणी | 02 | | | | | | | 1,1,1,1,1 | | | | | | |
| 7 | उतारा | 02 | | | | 1,1,1,1,1 | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | एकूण तास | 120 | 5/5 | | | 5/ 5 | | | 15/15 | | | | | 15/35 | 40/60 |

टिप : ( ) कंसातील गुण प्रश्नपत्रिकेतील असून ते पर्यायी आहेत.

प्रश्नपत्रिकेतील मूळ गुण =100

प्रश्नपत्रिकेतील मूळ गुण =153

Total No. of Questions 06

MODEL QUESTION PAPER –I 2022-23

नमुना प्रश्नपत्रिका –1

PUC .SECOND YEAR — MAX MARKS-100

विषय : मराठी — Time : 3.15 Hours

Subject : Marathi

---

**सूचना :** 1) हस्ताक्षर स्वच्छ व सुबक असावे.
2) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
3) व्याकरणाचे सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

**प्रश्न 1 ला.** **अ) अधोरेखीत शब्दाच्या विभक्ती कंसातील योग्य पर्याय निवडून लिहा.** **1x5=5**

1) बाबल स्वभावाने चांगला मुलगा आहे
2) संत जनाबाईंचे अभंग प्रसिध्द आहेत
3) मुलांनो ! परीक्षा मार्च महिन्यात आहे
4) घरात मुलांचा फारच गोंधळ होता.
5) मुंबईहून पाहुणे आताच घरी आले आहेत.

( संबोधन विभक्ती, प्रथमा विभक्ती, षष्ठी विभक्ती, सप्तमी विभक्ती, पंचमी विभक्ती )

**ब) खालील वाकप्रचारांच्या योग्य जोडया जुळवा.** **1x5=5**

| | |
|---|---|
| 6) अस्मिता जागी होणे | निराश होणे |
| 7) झडती घेणे | वार करणे |
| 8) प्रहार करणे | सर्व व्यवस्थित होणे |
| 9) बैजवार होणे | तपासून पाहणे |
| 10) हिरमोड होणे | स्वाभीमान जागा होणे |

**क) खालील कंसात दिलेले योग्य शब्द जोडून म्हणी पूर्ण करा.** **1x5=5**

11) दगडापेक्षा ..............................
12) चकाकते ते..............................
13) जेवीन तर तुपाशी ..............................
14) तोंड दाबून ..............................
15) गर्जेल तो..............................

( सोने नसते , नाहीतर उपाशी, बुक्यांचा मार, पडेल काय, वीट मऊ)

**ड) खालील समूहदर्शक वाक्यासाठी योग्य पर्यायाची निवड लिहा.** **1x5=5**

16) दररोज प्रसिध्द होणारे--------

अ) दैनिक ब) साप्ताहिक क) पाक्षिक ड) मासिक

17) दगडावर कोरलेले लेख ------

अ) ताम्रलेख ब) शिलालेख क) सोनलेख ड) पितळलेख

18) समाजात समता नांदावी असे म्हणणारा-----

अ) साम्यवादी ब) हुकुमशाही क) नोकरशाही ड) सामाजिक विषमतावादी

19) शेतकऱ्यांना मिळणारे सरकारी कर्ज ------

अ) मुद्दल ब) व्याज क)तगाई ड) दान

20) निरपेक्ष कामाबद्दल दिलेले सन्मानाचे धन ---------

अ) स्वागतधन ब) मानधन क) आत्मधन ड) आभारधन

**प्रश्न 2 रा अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा. 1x5=5**

21) आईने आपले बालक कोणाकडे दिले होते ?

22) एकोणिसाव्या शतकातील बहुजन समाजाला लागलेले दोन मोठे रोग कोणते आहेत?

23) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आराध्य दैवते कोणती आहेत?

24) वीरराणी चन्नम्माला कोण कोणत्या भाषा अवगत होत्या?

25) पंढरपूरची वारी कोणत्या संतानी सुरू केली आहे?

26) लेखक गं. बा. सरदार कोणत्या महाविद्यालयात प्राध्यापकाचे कार्य करीत होते?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. 1x6=6**

27) लेखक शशिकांत मांडके यांनी प्रदूषण निर्माण होण्याची कारणे सांगून त्यावर सूचविलेले उपाय लिहा.

28) ' आजीचे भाष्य' या पाठातील आजीचे स्वभावगुण लिहून देवाकडे काही मागू नये असे आजी का म्हणते?

**क) संदर्भासह स्पष्ट करा ( कोणतेही दोन) 3x2=6**

29) " आवो मेली जाय: काह्या रुसतासि

30) " शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे "

31) "अप्पा मी चुकले मला क्षमा करा."

**ड) टीपा लिहा ( कोणत्याही दोन) 2x4=8**

32) वाढाळू वयातील मुलांच्या बाबतीत पालकांची कर्तव्ये लिहा.

33) छत्रपती शिवाजी महाराजांनी सैनिकांना दिलेल्या सूचना लिहा.

34) सईने बाळा गवंडयाला शब्दाच्या शस्त्राने घडविलेली अद्दल लिहा.

**प्रश्न 3 रा. अ) खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा. 1x5=5**

35) शिवालय कोण बांधतात?

36) संत सोयराबाईने संसाराला कोणती उपमा दिली आहे ?

37) संत सेना न्हावी यांनी कोणाला गुरू मानले आहे?

38) सासुरवाशिण कोणत्या देवीची प्रार्थना करीत आहे?

39) राम सीतेची उपमा कोणाला दिली आहे?

40) घरातल्या घरात गजबजलेलं गाव कोणतं आहे?

**ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. 1x6=6**

41) ' गोफ ' कवितेचा भावार्थ लिहून विचार स्पष्ट करा.

42) " सखी" या कवितेतील दोन मैत्रिणींचा सवांद लिहून दु:खाचे वर्णन करा.

**क) संदर्भासह स्पष्ट करा. ( कोणतेही दोन )** **3x2=6**

43) निवली राने गुरे–वासरे;
निवली झाडे रांनपाखरे;
धनी अतंरी निवले सारे;
शेतकऱ्यांच्या पोटामधला निवेल कधी पण जाळ?

44) साम्राज्याच्या छुप्या दलाला अन जातीयवाद्यांना
कोटी हातांनी मूठ बांधूनी काढ झोडपून त्याला

45) एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील
रक्ताचे मोल आहे
तेच माझे इमान आहे
मी माझा शब्द गहाण टाकणार नाही.

**ड) टीपा लिहा ( कोणतेही दोन)** **2x4=8**

46) संत ज्ञानेश्वरांनी मागितलेले पसायदान लिहा.

47) नलराजा व हंसपक्षी यांच्यातील सवांद तुमच्या शब्दात लिहा

48) निष्ठा या कवितेचा भावार्थ सांगून खंत स्पष्ट करा?

**प्रश्न 4 था खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.** **2x5=10**

49) बाबलचे स्वभाव चित्रण तुमच्या शब्दात लिहा.

50) तात्यानी भुतकाळातील कोण कोणत्या घटना नानाला सांगितल्या आहेत ते लिहा.

51) विलासकाकांना आईची आठवण का झाली? आईने काय सांगितले होते?

**प्रश्न 5 वा अ) खालील विषायावर आवेदन पत्र लिहा.** **1x5=5**

52) संत तुकाराम पदवीपूर्व महाविद्यालय, निपाणी या महाविद्यालयात मराठी शिक्षक पदासाठी प्राचार्यांच्या नावे आवेदन पत्र लिहा.

**ब) खालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **1x5=5**

जगात नाना तऱ्हेची दु:खे आहेत, रोग आहेत, म्हातारपण आहे, मरण आहे. दास्य, दारिद्र्य आणि दैन्य आहे. अपयश , निराशा अपमान या निरनिराळया मानसिक यातना आहेत. त्याखेरीज माणसाचे अज्ञान आणि मूर्खपणा तर चोहोकडे तुडूंब भरून वाहतो आहे. अशा अनंत दु:खानी भरलेल्या जगात असहाय माणसाने कसे जगावयाचे? ही दु:खे नाहीशी करण्याचे सामर्थ्य तर त्याच्या अंगी नाही. पण निदान ह्या दु:खाच्या नांग्या त्याला तोडता आल्या आणि त्याच्या यातना त्याला कमी करता आल्या किंवा नष्ट करता आल्या तरी त्याला तेवढे पुरे आहे. जगातील दु:खाकडे गांभीर्याने पाहिले तर ती वाढतात आणि खेळकरपणे पाहिले तर ती कमी होतात. हे ज्या माणसाच्या प्रथम लक्षात आले तो विनोदाचा खरा जनक असे म्हणावयास हरकत नाही. दु:खाना हसावयाचे ती हसण्यावारी न्यावयाची हसून हसून ती विसरुन जायचे हा विनोदाचा खरा हेतू आहे. जगातील दु:खे हाच विनोदाचा विषय आहे. काव्यात केवळ आनंदच असतो आणि दु:ख नसते असे नव्हे. पण दु:खाकडे पाहण्याचा, काव्याच्या आणि विनोदाच्या दृष्टीकोनात फार मोठे अंतर आहे. दु:खामधून कवी करूणरस निर्माण करतो तर विनोदी त्याच दु:खांना हास्यरसाच्या पुरात बुडवून टाकतो.

53) माणसाला कोण– कोणत्या मानसिक यातना आहेत ?

54) जगातील दु:खे कमी करण्यासाठी कसे पाहिले पाहिजे?

55) विनोदाचा खरा हेतू कोणता आहे?

56) विनोदाचा विषय कोणता आहे?

57) दु:खापासून कोणता रस निर्माण होतो ?

**प्रश्न 6 वा खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** **1x10=10**

58) सार्वजनिक स्वच्छता: माझे कर्तव्य

59) स्त्री : कुटुंबाचा आधार

60) माझे आवडते शिक्षक